**अशासकीय खाजगी मान्यताप्राप्त शाळांतील घड्याळी तासिका तत्वांवर नेमलेल्या शिक्षकांच्या मानधनात वाढ करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः वेतन-१२१४/१९१/टीएनटी-३**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय विस्तार भवन,
मुंबई - ४०० ०३२.
दिनांक:- २१ नोव्हेंबर, २०२२

संदर्भ : -

१. शासन निर्णय, शिक्षण विभाग, क्र.आयएनएस-१०७०/जी, दिनांक-१५.०७.१९९४.
२. शासन निर्णय, शिक्षण व सेवा योजन विभाग, क्र.एचएससी-१३७८/६८९०३/(४९२३)/ उमाशि-१, दिनांक-०५.०१.१९८२.
३. शासन निर्णय, शिक्षण व सेवा योजन विभाग, क्र.चवेआ-१०८९/१११/माशि-२, दिनांक-०२.०९.१९८९.
४. शासन निर्णय, शिक्षण व सेवा योजन विभाग, क्र.खाशान्या-१०८९/३/माशि-३, दिनांक-०१.०८.१९९०.
५. शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र.एसएसएन-२१०३/(११३/०३)/माशि-२ दिनांक- २७.११.२००६.

प्रस्तावना-

राज्यातील मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा, उच्च माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयातून एखाद्या विषयासाठी अर्धवेळ शिक्षकांसाठी आवश्यक असलेला कार्यभार उपलब्ध होऊ शकत नसेल तर अशा विषयाच्या अध्यापनासाठी अर्हताप्राप्त व्यक्तीची तासिका तत्वावर नियुक्ती करण्यात येऊन त्यांना घड्याळी तासिकेनुसार मानधन देण्यात येते. संदर्भाधिन क्र.५ येथील शासन निर्णय दि.२७.११.२००६ अन्वये माध्यमिक, उच्च माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये घड्याळी तासिका तत्वांवर नियुक्त शिक्षकांना द्यावयाचे मानधन निश्चित करण्यात आले आहे. या मानधनामध्ये वाढ करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय-

राज्यातील मान्यताप्राप्त खाजगी अनुदानित माध्यमिक व उच्च माध्यमिक/कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये घड्याळी तासिका तत्वावर कार्यरत शिक्षकांच्या मानधनामध्ये पुढीलप्रमाणे वाढ करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | स्तर | सुधारीत दर (प्रति तास) |
|---|---|---|
| १ | उच्च माध्यमिक/कनिष्ठ महाविद्यालय | रू.१५०/- |
| २ | माध्यमिक | रू.१२०/- |

२. घड्याळी तासिका तत्वावर नियुक्त करण्यात येणारे शिक्षक पूर्णवेळ शिक्षकांप्रमाणे अर्हताप्राप्त असावेत. अर्हता पूर्ण नसलेल्या शिक्षकांची घड्याळी तासिका तत्वावर नियुक्ती करण्यात येऊ नये. सदर शासन निर्णय दि.०१/१२/२०२२ पासून अंमलात येईल.

३. सदरचा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.९४०/व्यय-५, दिनांक २७.०९.२०२२ अन्वये दिलेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०२२११२११५१६४९५२२१ हा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

TUSHAR VASANT MAHAJAN

Digitally signed by TUSHAR VASANT MAHAJAN
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SCHOOL EDUCATION AND SPORTS DEPARTMENT, 2.5.4.20=19c6c23f510a80926e9b7ee5db235979452f3f9e8918118634069a6cc7a22b9f, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=1A39CEF3C157B9EE6A2ABE5779ACF233682613F7B9C335D6BF4877267695CECA, cn=TUSHAR VASANT MAHAJAN
Date: 2022.11.21 15:20:13 +05'30'

**(तुषार महाजन)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई
२. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
३. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
४. शिक्षण संचालक प्राथमिक/ माध्यमिक व उच्च माध्यमिक, महाराष्ट्र राज्य, पुणे
५. संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे
६. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र- १/२, मुंबई/नागपूर
७. महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र- १/२, मुंबई/नागपूर
८. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
९. सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक व उच्च माध्यमिक)
१०. शिक्षण निरीक्षक (उत्तर/दक्षिण/पश्चिम), मुंबई
११. सर्व अधीक्षक, वेतन पथक (प्राथमिक/माध्यमिक व उच्च माध्यमिक)
१२. अर्थसंकल्प, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई
१३. निवड नस्ती (टीएनटी-३).